सत्यमेव जयते

(कृषि आयुक्तालय, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे)
कृषि भवन जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५
ई-मेल -phytocell@gmail.com
दुरध्वनी क्र.०२०-२५५३८०९५/२५५३७९५७

मार्गदर्शक सूचना — जा.क्र.कृआ/फलो-३/भौ.मा.-वापरकर्ता/मासू/३३१०४/२०२१

पत्र — दिनांक: ६ ऑक्टोंबर,२०२१

प्रति,

१. विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)

**विषय:** भौगोलिक मानांकन मान्यताप्राप्त फलोत्पादन पिकाचे अधिकृत वापरकर्ता वाढविण्यासाठी सन २०२१-२२ च्या मार्गदर्शक सूचना...

**संदर्भ:** १. आयुक्तालयाचे पत्र जा.क्रं.कृआ/फलो-३/कृनिमाकें/२३२२१/२०२१,दि.२०/०७/२०२१
२. आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.कृआ/फलो-३/भौमा/आढावाबैठक/२८७६९/२१,दि.२/९/२०२१
३. आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. कृआ/फलो-३/भौमा/आढावाबैठक/२८९१३/२१,दि.३/९/२०२१

केंद्र व राज्य शासनाने कृषि माल निर्यात धोरण लागू केले आहे. राज्यात दि.१५ ऑगस्ट, २०२१ रोजी जिल्हास्तरावर कृषि माल निर्यात कक्ष स्थापन करण्यात आलेले आहेत. सदरचे कृषि माल निर्यात केंद्रावर समन्वय अधिकारी यांची नेमणूक देखील करण्यात आलेली आहे. कृषि माल निर्यात अनुसरावयाची कार्यपद्धती, भौगोलिक मानांकन प्राप्त फळे व भाजीपाला पिकांचे वापरकर्ता वाढविणे. नविन फळे व भाजीपाला पिकास भौगोलिक मानांकन प्राप्त करणे व भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त कृषि उत्पादनांच्या नोंदणी, प्रचार, प्रसिद्धी व मुल्य साखळी विकसीत करणेसाठी पणन विभागाकडील योजनांबाबत सर्व जिल्ह्यातील कृषि माल मार्गदर्शन केंद्रातील अधिकारी/ कर्मचारी यांना दि.४ सप्टेंबर, २०२१ रोजी या विषयाचे राज्य स्तरावरुन वेबिनारद्वारे मार्गदर्शन / प्रशिक्षण देण्यात आले आहे.

भौगोलिक मानांकन प्राप्त संस्थेकडील फळे व भाजीपाला पिकांचे अधिकृत वापरकर्ते वाढविणे संदर्भात सन २०२१-२२ च्या मार्गदर्शक सूचना या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहेत. विभाग/जिल्हा/ तालुका स्तरावरील सर्व संबंधित क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचारी यांनी भौगोलिक मानांकन प्राप्त संस्थेच्या समन्वयाने सोबत सहपत्रीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी. सदर मार्गदर्शक सूचना नुसार भौगोलिक मानांकनाच्या कार्यक्षेत्रामधील उत्पादनाचे अधिकृत वापरकर्ते वाढविणेसाठी मोहीम स्वरुपात काम हाताळावे. अधिकृत वापरकर्ते वाढविणेसाठी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीच्या अनुंषगाने सोबतच्या प्रपत्र-१ नुसार मासिक प्रगती अहवाल आयुक्तालयास नियमित सादर करण्याची दक्षता घ्यावी.

**सोबत:** मार्गदर्शक सुचना

(धीरज कुमार)
**आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य**

**प्रत:** कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ, मार्केटयार्ड, गुलटेकडी, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव

## फलोत्पादन पिकांसाठी भौगोलिक चिन्हांकन (मानांकन) नोंदणीकृत उत्पादनाचे अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करण्यासाठी मार्गदर्शक सुचना

### १. प्रस्तावना:-

सन १९९५ साली प्रथमच कृषि विषयाचा जागतीक व्यापार करारामध्ये समावेश करण्यात आला त्यामुळे सदर करारानुसार जागतीक बाजारपेठ आता सर्वांसाठी खुली झालेली आहे. जागतीक व्यापार करारांतर्गत विविध करार करण्यात आले असून त्यामध्ये TRIPS (Trade Related Intellectual Property Right) हे पेटंट, डिझाईन आणि ट्रेडमार्क नोंदणी करण्याकरीता महत्त्वाचा करार आहे. या करारनुसार भौगोलीक क्षेत्राशी निगडीत उत्पादीत मालास संरक्षण देण्यासाठी संसदेने दि. ३०.१२.१९९९ मध्ये The Geographical Indication of Goods (Registration and Protection) Act- १९९९ पारीत केला आहे व अंमलबजावणी १५ सप्टेंबर २००३ पासून करण्यात येत आहे.

बौद्धीक संपदा हक्क (Intellectual Property Rights) कायद्यांतर्गत कृषि मालाकरीता भौगोलीक चिन्हांकन (जीआय) करण्याचे काम जीओग्राफीकल इंडीकेशन रजिस्ट्री कार्यालय, भारत सरकार यांचे कार्यालयामार्फत केले जाते. जीओग्राफीकल इंडीकेशन रजिस्ट्रेशन व प्रोटेक्शन कायदा- १९९९ अंतर्गत नोंदणी करण्याकरीता एकूण ३४ विभागात विभागणी केलेली आहे. त्यामध्ये मशिनरी, औद्योगीक उत्पादने, वैद्यकीय उपकरणे, कपडे, सौंदर्यप्रसाधने, सिंचन, उर्जा, कृषि, फलोत्पादन, कुकुटपालन, डेअरी इ. चा समावेश आहे. कृषि व फलोत्पादनाचा समावेश वर्गवारी क्रमांक ३१ मध्ये करण्यात आला आहे. जागतीक बाजारपेठामध्ये ट्रेडमार्क (व्यापारी चिन्ह) जसे महत्त्व प्राप्त झाले आहे त्याप्रमाणेच भौगोलीक क्षेत्राशी निगडीत कृषिमालाची गुणवत्ता, सातत्य व विशेष गुणधर्माबाबत भौगोलीक चिन्हांकन नोंदणीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. भारतामध्ये बहुतांश कृषिमाल मानव निर्मीत असल्याने त्यातील काही कृषि मालाची स्वत:ची अशी खास गुणवत्ता आहे. त्या कृषि मालाची ही गुणवत्ता वर्षानुवर्ष, पिढ्यानपिढ्या चालत आलेली आढळून येते. त्यामध्ये तसूभरही फरक पडलेला नसतो. त्या कृषिमालाच्या खास गुणवत्तापुर्ण उत्पादनामध्ये त्या विशिष्ट प्रदेशामध्ये सातत्य राखलेले आढळून येते. तेच उत्पादन इतर ठिकाणीही तशाच प्रकारच्या हवामानात किंवा जमिनित घेतले जाते परंतू त्या कृषिमालाला अशी खास गुणवत्ता येत नाही. कारण अशी खास गुणवत्ता ही त्या त्या विशिष्ट क्षेत्राशी, प्रदेशाशी निगडीत असते. त्या खास गुणवत्तपुर्ण उत्पादनासाठी वापरावयाची विशिष्ट उत्पादन पध्दती, तंत्र, मनुष्यबळाचे कौशल्य हे त्या विशिष्ट ठिकाणी पिढ्यानपिढ्या विकसीत झालेले असते. त्या खास गुणवत्तेची त्या प्रदेशाशी किंवा क्षेत्राशी नाळ जुळलेली असते. ही खास गुणवत्ता ही त्या प्रदेशाची संपत्ती असते, मालमत्ता असते. ही त्यांची खास गुणवत्ता ही त्या त्या भागातील क्षेत्राशी संबंधीत असल्यामुळे खास प्रसिध्द आहे. देशात आतापर्यंत एकूण भौगोलीक चिन्हांकन ३२२ कृषि व इतर उत्पादनांना प्राप्त झाले आहे. महाराष्ट्र राज्यात एकून ३३ प्रकारच्या उत्पादनास भौगोलीक चिन्हांकन प्रदान करण्यात आले आहे. त्यामध्ये कृषि व फलोत्पादनाच्या २६ पिकांचा समावेश आहे.

२. व्याप्ती व सद्यस्थिती:-

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर असून राज्यातील विविध भागामध्ये उत्कृष्ट दर्जाचे फळे व भाजीपाला उत्पादन घेतले जाते. फलोत्पादन विभागांतर्गत राबविण्यात आलेल्या विविध फळबाग लागवड योजनामुळे संपूर्ण राज्यामध्ये फळबागाखालील क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. विविध फळे व भाजीपाल्याची क्षेत्र, उत्पादन व उत्पादकता यामध्ये लक्षणीय वाढ झालेली आहे व दिवसेदिवस होत आहे. राज्यातील विविध विभाग व जिल्हे आता फ़ळपिकनिहाय देशात त्या नावाने ओळखले जात आहेत. विविध फळे व भाजीपाल्याची ओळख त्या त्या भागातील वैविद्यपुर्ण बाबीकरीता प्रसिध्द आहेत. म्हणून त्या भागाची ओळख पिकाच्या नावाने प्रसिध्द आहे. वरील वस्तूस्थितीचा विचार करून सदर पिकाच्या गुणवत्तेस हमी भाव मिळण्याचे दृष्टीकोनातून भौगोलीक चिन्हांकन नोंदणीस विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. युरोपियन देशांमध्ये भौगालिक चिन्हांकनाचा दर्जा असलेल्या पिकास/मालास प्रोटेक्टेड जिओग्राफिकल इंडीकेशनचा दर्जा दिला जातो. अशा मालास तेथील ग्राहकाची जास्त पसंती असते.

राज्यात **महाबळेश्वर (सातारा )- स्ट्रॉबेरी, नाशिक- द्राक्षे , नाशिक -व्हॅली वाईन, वायगाव (वर्धा)- हळद, भिवापुरी (नागपूर) -लाल मिरची, सिंधुदुर्ग व रत्नागिरी -कोकम , नागपूर-संत्रा, कोकण -हापूस, लासलगाव (नाशिक) - कांदा, जळगाव- केळी, जळगाव-भरीत वांगे, सासवड(पुणे)-अंजीर, सोलापूर- डाळिंब, सांगली-हळद, सांगली- बेदाणा, जालना- मोसंबी, बीड- सिताफळ, मराठवाडा केशर आंबा, वेंगुर्ला(सिंधुदुर्ग)- काजू, घोलवड (पालघर)-चिक्कू** अशा एकूण २० फलोत्पादन उत्पादनांना The Geographical Indication (Registration & Protection) of Goods Act १९८८ अंतर्गत भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालय, चेन्नई यांचेकडून भौगोलीक चिन्हांकनाचा दर्जा प्राप्त आहे.

महाराष्ट्रातील ज्या विविध फळे व भाजीपाला उत्पादनांना भौगोलिक मानांकन मिळाले आहे त्यांच्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत एक स्वतंत्र ब्रँड तयार करण्याची संधी निर्माण झाली आहे. सध्या हापूस आंबा, घोलवड चिकू, सोलापूर डाळिंब, सासवड अंजीर, सांगली बेदाना, वेंगूर्ला काजू, जळगाव केळी या पिकाचे उत्पादन व विक्री करीता अधिकृत वापरकर्ता म्हणून काही शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे. तसेच चालू वर्षी कोकणचा हापूस व घोलवडचा चिक्कू यांचे जीआय लेबल लावून युनायटेड किंगडम या देशात प्रथमच निर्यात करण्यात आली. जळगावची केळी ही जीआय लेबल लावून दुबईला निर्यात करण्यात आली. भौगोलिक चिन्हांकनाच्या वापरामुळे निर्यातीमध्ये अधिक प्रीमियम किंमत मिळत आहे. त्याचा फायदा जीआय मानांकित अधिकृत वापरकर्ता शेतकऱ्यांना होत आहे.

"भौगोलिक चिन्हांकन ही एक प्रकारची मानांकन नोंद आहे, जी भौगोलिक क्षेत्राशी निगडीत आहे. नैसर्गिकरित्या व मानवी प्रयत्नातून उत्पादित होणाऱ्या कृषी मालाची ओळख, त्याद्वारे त्याची खास गुणवत्तेतील सातत्य व त्यांच्यामधील विशेष गुणधर्माचे जतन करण्यासाठी हे चिन्हांकन उपयुक्त आहे. भौगोलिक चिन्हांकन प्राप्त फलोत्पादन पिकाकरीता ब्रँडिंगद्वारे विक्री व निर्यातीकरीता या उत्पादकांना स्थानिक व जागितक बाजारात विक्रीसाठी अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे भौगोलिक मानांकन ब्रँडचा फायदा घेऊन आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनांना अधिकाधिक मूल्य प्राप्त करून घेण्यासाठी राज्यातील सर्व जीआय मानांकित पिकाच्या

कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आपल्या पिकाचे / बागेचे अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

३. कार्यपध्दतीचे स्वरुप:-

राज्यातील शेतमालांची चांगली वैशिष्टये जतन करणे व त्याचा दर्जा टिकवून ठेवण्यासाठी, शेतमालास कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच योग्य ती बाजारपेठ मिळावी या उद्देशाने शासनाने सन २०१४-१५ मध्ये राष्ट्रीय कृषि विकास योजना अंतर्गत योजना कार्यान्वित केली होती. सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र राज्यामध्ये एकूण २० प्रकारच्या फळपिके व प्रक्रियायुक्त पदार्थांना भौगोलिक चिन्हांकन प्राप्त झाले आहे. भौगालिक चिन्हांकन प्राप्त उत्पादनांना स्थानिक, राज्यस्तरीय, देशांर्तगत व देशाबाहेरील बाजारपेठ उपलब्ध करुन देणे यासाठी जिल्हास्तरावर

१) कृषि निर्यात मार्गदर्शन कक्षामध्ये भौगालिक चिन्हांकनाचे नोंदणी व भौगालिक चिन्हांकन प्राप्त उत्पादनाचे वापरकर्ते वाढविणेसाठी पिकनिहाय कक्ष निर्मिती करणे.

२) उपभोक्त्यांमध्ये जनजागृती करण्यासाठी प्रचार व प्रसिद्धीव्दारे भौगालिक चिन्हांकन प्राप्त पिकांचे महत्व समजावून सांगणे

३) विक्री व्यवस्थापन प्रणाली विकसित करणे व भौगालिक चिन्हांकन प्राप्त उत्पादकांना पायाभूत प्रशिक्षण देणे.

४) भौगालिक चिन्हांकनाचे (जीआय) लोगो, बाजार मुल्य व निर्यातीसंदर्भात मार्गदर्शन करणे.

५) भौगोलिक चिन्हाकांन प्राप्त भागात विविध ठिकाणांकडे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी हे क्षेत्र विकसित केले जाऊ शकते. सदर भागात पर्यटक भेटी देऊन प्रत्यक्ष उत्पादक निर्मितीचा अनुभव व चव चाखून उत्पादन खरेदी करु शकतात.

भौगोलिक चिन्हांकन प्राप्त उत्पादक समुहांना अधिकृत वापरकर्ता म्हणून उत्पादकांची नोदंणी करणेसाठी असलेले शुल्क रु.६००/- वरुन नाममात्र १० /-रुपये करण्यात आलेले आहे. त्यामुळे अधिकृत वापरकर्ता म्हणून जास्तीत जास्त उत्पादकांना भौगोलिक चिन्हांकनाचा लाभ घेण्यासाठी मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. त्यामुळे भौगोलिक मानांकन प्राप्त फळपिकांना जागतिक दर्जाची बाजारपेठ उपलब्ध होवून सर्वसामान्य शेतकऱ्यांचे आर्थीक उत्पन्न वाढून जीवनमान उंचावेल व मा. पंतप्रधान यांचे सन २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा उद्देश सफल होवू शकेल. युरोपियन देशांमध्ये भौगालिक चिन्हांकनाचा दर्जा असलेल्या पिकास/मालास प्रोटेक्टेड जिओग्राफिकल इंडीकेशनचा दर्जा दिला जातो. अशा मालास तेथील ग्राहकाची जास्त पसंती असते. निर्यात केलेल्या मालास योग्य तो मोबदला मिळणे त्याचबरोबर तेथील ग्राहकांमध्ये येथे उत्पादित केलेल्या मालाबाबत विश्वासार्हता निर्माण करण्याच्या दृष्टीकोनातून भौगोलिक चिन्हांकन प्राप्त उत्पादनाचे जास्तीत जास्त अधिकृत वापरकर्ते नोंदणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धतीच्या मार्गदर्शक सुचना देण्यात येत आहे.

अ. **भौगोलिक चिन्हांकित उत्पादनासाठी अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करण्याची कार्यपद्धती:**

भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालयामार्फत ज्या पिकांना भौगोलिक चिन्हांकनाचा दर्जा प्राप्त झाला आहे त्या पिकाच्या भौगोलिक क्षेत्रातील संबंधित पिकाच्या उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करता येते.

ब. **अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे:**

अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करण्यासाठी खालील कागदपत्रांची पूर्तता करावी लागते

१) भौगोलिक चिन्हांकित पिकाचे अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करण्यासाठी भौगोलिक चिन्हांकन (GI)- ३A मध्ये अर्ज करणे आवश्यक. नमुना सोबत सहपत्रीत करण्यात आला आहे.

२) अर्जासोबत ७/१२ ची स्वयं साक्षांकित प्रत तसेच सदर पिकाची ट्रेसिबिलीटी नेट अंतर्गत नोंदणी केली असल्यास नोंदणीची प्रत

३) भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत कार्यक्षेत्रातील पिकाचे उत्पादक असल्याचे व त्या दर्जाचे उत्पादन करणार असल्याबाबतचे शेतकऱ्याचे हमीपत्र

४) संस्थेच्या नावाने ज्या पिकाकरीता भौगोलिक चिन्हांकन प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे त्या संस्थेकडून संबंधित शेतकऱ्यांच्या नावाने अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करण्याकरीता संस्थेचे शिफारस पत्र

५) अधिकृत वापरकर्ता नोंदणी करण्यासाठी निर्धारित केलेली फी रूपये १०/- धनाकर्ष किंवा धनादेशाद्वारे निबंधक (Registrar) भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालय, चेन्नई यांच्या नावे निर्गमीत करणे आवश्यक.

क. **अधिकृत वापरकर्ता नोंदणी करण्याकरीता अर्जात भरावयाचा तपशील (अर्जाचा नमूना (GI)- ३A नुसार):**

१) ज्या शेतकऱ्यांना अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करावयाची आहे त्या शेतकऱ्याचे पूर्ण नाव

२) अर्जदार शेतकऱ्याचा पूर्ण पत्ता

३) ज्या पिकाकरीता अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी करावयाची आहे त्या पिकाचे भौगोलिक मानांकन प्रमाणपत्राचा क्रमांक व दिनांक

४) अर्जदार शेतकऱ्याचा ई-मेल आयडी

५) अर्जदाराचा फोन क्रमांक किंवा भ्रमणध्वनी क्रमांक

ड. **अर्जदाराने सादर करावयाचे हमीपत्र (अर्जाचा नमूना (GI)- ३A नुसार):**

१) भौगोलिक चिन्हांकन नोंदणीकृत संस्थेचे नाव व मानांकन क्रमांक.

२) सदर पिकाचे उत्पादन व गुणवत्तेबाबत अर्जासोबत दिलेली माहिती खरी असल्याबाबतचे हमीपत्र.

३) माझ्या चुकीच्या माहितीमुळे माझा अर्ज रद्द झाला किंवा मला मिळालेले अधिकृत वापरकर्ता प्रमाणपत्र चुकीच्या माहितीमुळे रद्द झाल्यास माझी काही तक्रार राहणार नाही.

४) दिनांक, ठिकाण, अर्जदाराची स्वाक्षरी, इत्यादी तपशील अधिकृत वापरकर्ता नोंदणी करण्याकरीता विहित केलेल्या अर्जामध्ये संबंधित शेतकऱ्यांनी माहिती देणे आवश्यक आहे.

इ. **अधिकृत वापर करता नोंदणी कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याचा पत्ता:**

**रजिस्ट्रार ,**

**जिऑग्राफिकल इंडिकेशन रजिस्ट्री ऑफिस,**

**इंटलेक्च्युअल प्रोपर्टी इंडिया बिल्डिंग,**

**जीएसटी रोड चेन्नई, पिन कोड- ६००० ३२**

**ऑफिस दुरध्वनी क्रमांक ४४- २२५०२०९२**

अधिकृत वापरकर्ता नोंदणी करण्यासाठी वैध प्रपत्रातील अर्ज व त्यासोबत निर्धारित केलेली योग्य ती सर्व कागदपत्र जोडून सदरचा प्रस्ताव वर नमूद केलेल्या पत्त्यावर कुरियर किंवा स्पीड पोस्टद्वारे पाठवावे लागते.

ई. **अधिकृत वापरकर्ता प्रमाणपत्र निर्गमीत करण्याची कार्यपद्धती:**

१) अधिकृत वापरकर्ता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्ज प्राप्त झाल्यानंतर भौगोलिक चिन्हांकन नोंदणी कार्यालयामार्फत अर्जाची छाननी केली जाते.

२) छाननीत काही त्रुटी आढळून आल्यास त्या त्रुटीची पूर्तता करण्याकरीता संबंधित अर्जदार किंवा ज्या संस्थेमार्फत अर्ज प्राप्त झाला आहे त्यांना लेखी कळविण्यात येते .

३) छाननीमध्ये जर अर्ज पूर्ण आढळून आल्यास त्या अर्जाची नोंद करून या अर्जात एक युनिक नंबर दिला जातो व त्याची नोंद सदर संस्थेच्या वेबसाईटवर केली जाते.

४) सर्वसाधारणपणे अधिकृत वापरकर्ता नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी सहा ते आठ महिन्यांचा कालावधी लागतो .

५) अधिकृत वापरकर्ता नोंदणी प्रमाणपत्र दहा वर्षासाठी ज्या शेतकऱ्यांनी अर्ज केलेला आहे त्या शेतकऱ्याच्या नावाने दिला जातो व सदर संस्थेच्या वेबसाईटवर त्याची नोंद घेतली जाते.

४. अधिकृत वापरकर्ता नोंदणीचे फायदे:

१) भौगोलिक चिन्हांकन मानांकित नोंदणीकृत पिकाचे अधिकृत वापरकर्ता म्हणून ओळख होते.

२) अधिकृत वापरकर्ता म्हणून नोंदणी केल्यामुळे भौगोलिक चिन्हांकनाचा लोगो लावून विक्री करता येते. या पिकाची वैशिष्ट्यपूर्ण गुणधर्माची ओळख निर्माण करून त्याची ग्राहकाला विक्री करण्यास मदत होते.

३) भौगोलिक चिन्हांकनाचा अधिकृत लोगो वापरून विक्री केल्यामुळे अधिक (प्रीमियम) किंमत मिळण्यास मदत होते.

४) भौगोलिक चिन्हांकन प्राप्त पिकाची निर्यातदारामार्फत निर्यात करता येते किंवा स्वतः निर्यात करता येते.

**५. भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनासाठीच्या योजना:**

कृषी निर्यात धोरणांतर्गत कृषिमाल निर्यातीला चालना देण्यासाठी भौगोलिक चिन्हांकन पिकाची नोंदणी व अधिकृत वापरकर्ता म्हणून शेतकऱ्यांनी नोंदणी करण्याकरीता कृषी विभाग, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ व संबंधित पिकाचे भौगोलिक चिन्हांकन प्राप्त संस्थेच्या समन्वयाद्वारे अधिकृत वापरकर्ता नोंदणीची अधिक प्रभावी मोहीम राबविणे त्यास संबंधित पिकाच्या उत्पादक शेतकऱ्यांचा अधिकाधीक सहभाग घेणे आवश्यक आहे. याद्दष्टीने भौगोलिक मानांकनासाठी पिकांची नोंदणी करणे तसेच नोंदणीकृत भौगोलिक चिन्हांकन पिकाचे अधिकृत वापरकर्ता म्हणून शेतकऱ्यांची नोंदणी करणे, प्रचार व प्रसिद्धी, ब्रँडिंग, विक्री व निर्यातीकरीता महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ यांचेमार्फत विविध योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांद्वारे संबंधित शेतकरी किंवा संबंधित संस्था यांना अर्थसहाय्य उपलब्ध करून देण्यात येते. भौगोलिक मानांकन प्राप्त उत्पादनासाठी महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ योजनेसाठीचे योजना निहाय निकष, अटी व शर्ती खालीलप्रमाणे असून सदर योजनांतर्गत आवश्यक बाबीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करावेत.

**योजना क्र. १ भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त कृषी उत्पादनांचे प्रचार व प्रसिद्धीरसाठी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजनासाठी अनुदान योजना:**

**उद्देश:** भौगोलिक चिन्हांकन/मानांकन संदर्भातील माहिती सर्व घटकापर्यंत पोहोचवणे, उत्पादकांना नोंदणीसाठी प्रोत्साहीत करणे व नोंदणीचे आवश्यकतेबाबतची माहिती उत्पादकांना देणे.

**लाभार्थी:** भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादनांची मालकी असणाऱ्या संस्था.

**लाभाचे स्वरूप:** एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजनासाठी कमाल मर्यादा रूपये १०,०००/- प्रति प्रशिक्षण (किमान १०० शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण साहित्य व अनुषांगिक खर्चासाठी) या मर्यादेत अनुदान देय.

**कालावधी:** १ दिवस

पात्रतेचे निकष:

१) भौगोलिक चिन्हांकन/मानांकन प्राप्त उत्पादकांचे मालकी हक्क असणाऱ्या संस्थेमार्फत पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव कृषी पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे सादर करावा.

२) त्यासोबत कार्यक्रमाचा दिनांक, वेळ, ठिकाण तसेच मार्गदर्शकांची सुची सोबत जोडावी.

३) पूर्वमान्यता असणाऱ्या संस्थेस कार्यक्रमासाठी अनुदान देय राहील.

४) अनुदान मागणीचा अंतिम प्रस्ताव कार्यक्रमानंतर ३० दिवसांचे आत कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय यांना सादर करावा.

५) योजना महाराष्ट्र राज्यासाठी मर्यादित राहील.

६) अनुदान मागणी अर्ज मंजूर करणे अथवा पूर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ यांना राहतील.

७) सर्व २४ उत्पादने मिळून खालीलप्रमाणे कमाल प्रशिक्षण कार्यक्रम मर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

| कार्यक्षेत्र | कार्यक्रम संख्या |
|---|---|
| तालुका | ३ |
| जिल्हा | १५ |

आवश्यक कागदपत्रे:

| पूर्व मागणी प्रस्ताव | अंतिम प्रस्ताव |
|---|---|
| १. पूर्व मान्यता मागणी अर्ज.<br>२. प्रस्तावित कार्यक्रमाचे ठिकाण, वेळ, दिनांक व वक्ते याबाबत तपशील<br>३. मागणी करणारे संस्थेचे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी हक्कबाबत GI Registry चे प्रमाणपत्र<br>४. अटी व शर्ती मान्य असल्याचे संस्थेचे हमीपत्र<br>५. लाभार्थी संस्थेचे बँक तपशील- पासबुक झेरॉक्स प्रत | १. अनुदान मागणी अर्ज<br>२. कार्यक्रम अहवाल<br>३. उपस्थितांची यादी (नाव,गाव,मोबाईल क्रमांक, पिकाचे नाव, क्षेत्र, सही इ.) व फोटो.<br>४. संस्थेने केलेल्या खर्चाची बिले.<br>५. पूर्व मान्यता पत्राची प्रत. |

**योजना क्र.२. भौगोलीक चिन्हांकन / मानांकन नोंदणीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याकरीता नोंदणी शुल्कासाठी अनुदान योजनाः**

**उद्देशः** भौगोलीक चिन्हांकन / मानांकन नोंदणीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करणे.

**लाभार्थी:** शेतकरी उत्पादक. (भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणाऱ्या संस्थेचे माध्यमातुन)

**स्वरुपः** भौगोलीक चिन्हांकन / मानांकन नोंदणीसाठी शासकीय नोंदणी शुल्कापोटी येणाऱ्या खर्चाचे ५० टक्के अथवा प्रती लाभार्थी कमाल रु.८०० मर्यादेपर्यंत अनुदान शेतकऱ्यांसाठी संबंधित कृषि उत्पादनाचे मालकी असणाऱ्या संस्थेला देण्यात येईल.

**पात्रतेचे निकषः**

१) शेतकऱ्यांनी भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणी केलेली असावी व नोंदणी क्रमांक प्राप्त झालेला असावा.

२) शेतकऱ्याचे ७/१२ उताऱ्यावर पिकाची नोंद आवश्यक.

३) योजना महाराष्ट्र राज्यासाठी मर्यादीत राहील.

४) अनुदान मागणी अर्ज मंजूर करणे अथवा पूर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषि पणन मंडळ यांना राहतील.

**प्रस्तावासोबत सादर करावयाचे कागदपत्रेः**

१) भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणाऱ्या संस्थेचा अर्ज

२) संबंधित शेतक-यांचे अर्ज

३) शेतकऱ्यांचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत

४) भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणाऱ्या संस्थेचा बँक तपशील

५) संस्थेचे हमीपत्र

उपरोक्त कागदपत्रासह प्रस्ताव संस्थेमार्फत प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाचे आत कृषि पणन मंडळाच्या कार्यालयाकडे सादर करावा.

**योजना क्र.३. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणी प्राप्त उत्पादनांचे मुल्यसाखळी विकसीत करण्यासाठी प्रोत्साहन अनुदान योजनाः**

**उद्देशः** भौगोलिक चिन्हांकन/मानांकन नोंदणीकृत नैसर्गिक गुणवत्ता असलेली उत्पादने ग्राहकांपर्यंत पोहचवणे, भेसळीला प्रतिबंध करणे, विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात उत्पादीत होणारी उत्पादने चिन्हासह विक्री करणेसाठी बाजार विकासाकरीता (सुयोग्य पॅकींग, लेबलिंग, ब्रँडींग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) अर्थसहाय्य करणे.

**लाभार्थी:** भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणारी असणारी संस्थां.

**स्वरुप:** उत्पादनांच्या बाजार विकासाकरीता (सुयोग्य पॅकींग, लेबलिंग, ब्रँडींग, बारकोड, वेबसाईट विकास इ.) येणाऱ्या खर्चाच्या ५० टक्के जास्तीत जास्त ३,००,०००/- पर्यंत अर्थसहाय्य कृषि उत्पादनाचे मालकी असणाऱ्या संस्थेला देण्यात येईल.

**निकष:**

१) भौगोलिक चिन्हांकन/मानांकन मालकी असणाऱ्या संस्थेने उत्पादनांच्या बाजार विकासाकरीता सुयोग्य पॅकींग, लेबलींग, ब्रँडिंग, बारकोड, वेबसाईट विकास इ. पैकी कामकाज करणे बंधनकारक आहे.

२) लाभार्थी संस्थेने पूर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. पूर्वमान्यता असेल तरच अनुदानास पात्र राहील.

३) उपरोक्त नमूद कामकाजासंदर्भात विस्तृत माहिती व त्याचा उत्पादनाच्या बाजार विकासाकरीता कसा परिणाम होईल, प्रस्तावित लाभार्थी शेतकरी संख्या याबाबत माहिती सादर करणे बंधनकारक राहील.

४) सदर कामकाज करुन घेण्याकरीता संबंधीत सेवापुरवठादार कंपनी / संस्थेचे कामकाजाच्या विस्तृत तपशीलासह दरपत्रके सादर करणे बंधनकारक राहील.

५) एकापेक्षा अधिक कामकरीताचे दरपत्रकामध्ये कामनिहाय रक्कम नमूद करावी.

६) विविध कामाकरीता एकापेक्षा जास्त सेवादार असतील तर तसा उल्लेख प्रस्तावामध्ये करावा.

७) अनुदान मागणीचा अंतीम प्रस्ताव कामकाज पूर्ण झाल्याच्या १ महिन्याचे आत कृषि पणन मंडळाचे संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

८) एका संस्थेस एका वर्षात फक्त एकदाच सदर योजनेचा लाभ मिळेल.

९) अनुदान मागणी अर्ज मंजुर करणे अथवा पूर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक, कृषि पणन मंडळ यांना राहतील.

| पूर्व मान्यतेचा प्रस्ताव | अनुदान मागणी प्रस्ताव |
|---|---|
| १. अर्ज<br>२. मागणी करणाऱ्या संस्थेचे भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी हक्क बाबत GI Registry चे प्रमाणपत्र<br>३. अटी व शर्ती मान्य असल्याचे संमत्तीपत्र<br>४. कामकाजासंदर्भात विस्तृत माहिती व त्याचा उत्पादनाच्या बाजार विकासाकरीता कसा | १. मागणी अर्ज<br>२. पूर्वमान्यतेचे पत्र<br>३. सेवापुरवठादार कंपनी / संस्थेने केलेल्या कामकाजाचे फोटोसहीत विस्तृत तपशिलासह अहवाल<br>४. ४.सेवापुरवठादार यांचेकडून केलेल्या |

| पूर्व मान्यतेचा प्रस्ताव | अनुदान मागणी प्रस्ताव |
|---|---|
| परिणाम होईल. प्रस्तावित लाभार्थी शेतकरी संख्या, कामकाज पुर्ण होण्याचा कालावधी याबाबत माहिती.<br>५. सेवापुरवठादार कंपनी / संस्थेचे कामकाजाच्या विस्तृत तपशिलासह दरपत्रके<br>६. लाभार्थी संस्थेचा बँक तपशिल-पासबुक झेरॉक्स प्रत | कामाचे देयक<br>५. भौगोलिक चिन्हांकन/मानांकन उत्पादकाचे मालकी संस्थेने सेवापुरवठादार यांना अदा केलेल्या रकमेचा उल्लेख असलेबाबत सेवानपुरवठादाराचे बँक पासबुक / स्टेटमेंट ची सत्यप्रत.<br>६. अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र. |

**योजना क्र ४. कृषि पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव उपक्रमामधील भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादनांच्या स्टॉलकरीता अर्थसहाय्य योजन:**

**उद्येश:** भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादने थेट ग्राहकांपर्यत पोहोचविणे.

**लाभार्थी:** भौगोलिक चिन्हांकन / मानांकन मालकी असणारी संस्था.

**स्वरुप:** प्रति स्टॉल रु. ३०००/- अर्थसहाय्य.

**निकष:**

१) भौगोलिक चिन्हांकन / मानांकन प्राप्त उत्पादकांचे मालकी हक्क असणा-या संस्थेमार्फत पूर्व मान्यतेसाठी प्रस्ताव कृषि पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे सादर करावा.

२) पूर्वमान्यता असणा-या संस्थेलाच अनुदान देय राहील.

३) पणन मंडळाच्या फळे व कृषिमाल महोत्सव योजनेअंतर्गत असलेल्या स्टॉलकरीता अर्थसहाय्य उपलब्ध होईल.

४) सदर स्टॉलमध्ये भौगोलिक चिन्हांकन / मानांकन नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांचाच माल विक्रीसाठी ठेवावा.

५) अनुदान मागणीच्या अंतीम प्रस्तावासोबत स्टॉलमध्ये सहभागी शेतकरी, त्यांच्या विक्री झालेल्या मालाच्या विवरण स्टॉलच्या फोटोसह सादर करावा.

६) अनुदान मागणीचा अंतीम प्रस्ताव प्रदर्शनाच्या अंतिम तारखेपासुन १ महिन्याचे आत कृषि पणन मंडळाचे संबंधीत विभागीय कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

७) अनुदान मागणी अर्ज मंजूर करणे अथवा पुर्णपणे फेटाळण्याचे सर्वस्वी अधिकार कार्यकारी संचालक,कृषि पणन मंडळ यांना राहतील.

| पूर्व मान्यतेचा प्रस्ताव | अनुदान मागणी प्रस्ताव |
|---|---|
| १. संस्थेचा अर्ज<br>२. शेतक-यांचे अर्ज (भौगोलिक चिन्हांकन / मानांकन अंतर्गत नोंदणी क्रमांकासह)<br>३. मागणी करणारी संस्थेचे भौगोलिक चिन्हांकन / मानांकन उत्पादकाचे मालकी हक्क बाबत GI Registry चे प्रमाणपत्र<br>४. अटी व शर्ती मान्य असल्याचे हमीपत्र<br>५. भौगोलिक चिन्हांकन / मानांकन प्राप्त उत्पादकांचे मालकी हक्क असणाऱ्या संस्थेचा बँक तपशिल पासबुक झेरॉक्स प्रत | १. मागणी अर्ज<br>२. पुर्वमान्यतेचे पत्र<br>३. स्टॉलमध्ये सहभागी नोंदणीकृत शेतकरी / माल पुरवठादार नोंदणीकृत शेतक-याची यादी<br>४. त्यांच्या विक्री झालेल्या मालाचे विवरण<br>५. स्टॉलचा फोटो |

(धीरज कुमार)

आयुक्त कृषि, महाराष्ट्र राज्य

भौगालिक चिन्हांकन अधिकृत वापरकर्ता नोंदणी करावयाचा (GI)– ३A अर्जाचा नमुना

**Geographical Indications of Goods (Registration & Protection) Act, 1999**

**Geographical Indications of Goods (Registration & Protection) Rules, 2002**

**Form GI 3A**

**Application for the Registration of an Authorized User [Section 17 (1), Rule 56 (1)]**

**Fee: Rs. 10 [See entry No.3A of the First Schedule]**

---

(1) Name of the Applicant (proposed Authorized user): ____________________________________

(2) Address of the applicant ____________________________________________________________

(3) Address of service (if different from Above) : __________________________________________

(4) Registered Geographical Indication for which application is made: _________________________

(5) Email id: _________________________________________________________________________

(6) Phone/mobile number: _____________________________________________________________

**Declaration:**

(1) I hereby declare that I have enclosed the statement of case and evidence of due service of copy of my application to the registered proprietor ---------------------------- (Name of registered proprietor) for____________, registered as a Geographical Indication.

(2) I also declare that all the above information is true and correct to the best of my knowledge and belief.

(3) I undertake that if any of the information is found incorrect or false, my application may be rejected and if already accepted, my registration maybe revoked and my name removed from Part B of the register.

Date:

Place: SIGNATURE OF APPLICANT

(Name of Applicant)

प्रपत्र-१

भौगोलिक मानांकन प्राप्त पिकांचे अधिकृत वापरकर्ते वाढविणेबाबतचा मासिक अहवाल

माहे अखेर:

| अ. क्र. | जिल्हा/ संभाग | जिल्हा व संभागस्तरीय भौगोलिक मानांकन समन्वय अधिकारी | | मानांकन प्राप्त संस्थेचे नांव | मानांकन प्राप्त दिनांक व प्रमाणपत्र क्रमांक | मानांकन प्राप्त पिकाचे नाव | प्रति कृषि सहाय्यक किमान १०० प्रमाणे अधिकृत वापरकर्ते वाढविण्यासाठी दिलेला वार्षिक लक्षांक | मान्यता प्राप्त वापरकर्ता वाढविणेसाठी संस्थेकडे प्राप्त प्रस्ताव | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नाव | हुद्दा | | | | | अहवाल महिन्यातील प्राप्त प्रस्तावांची संख्या | मानांकन प्राप्त दिनांक ते अहवाल महिना अखेरपर्यंत संस्थेकडे एकूण प्राप्त प्रस्तावांची संख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ९ | १० | ११ |
| १ | ठाणे | | | | | | | | |
| २ | पालघर | | | | | | | | |
| ३ | रायगड | | | | | | | | |
| ४ | रत्नागीरी | | | | | | | | |
| ५ | सिंधुदुर्ग | | | | | | | | |
| | कोकण संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **कोकण सभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| ६ | नाशिक | | | | | | | | |
| ७ | धुळे | | | | | | | | |
| ८ | नंदुरबार | | | | | | | | |
| ९ | जळगाव | | | | | | | | |
| | नाशिक संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **नाशिक सभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| १० | अहमदनगर | | | | | | | | |
| ११ | पुणे | | | | | | | | |
| १२ | सोलापूर | | | | | | | | |
| | पुणे संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **पुणे सभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| १३ | सातारा | | | | | | | | |
| १४ | सांगली | | | | | | | | |
| १५ | कोल्हापूर | | | | | | | | |
| | कोल्हापूर संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **कोल्हापूर संभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| १६ | औरंगाबाद | | | | | | | | |
| १७ | जालना | | | | | | | | |
| १८ | बीड | | | | | | | | |
| | औरंगाबाद संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **औरंगाबाद संभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| १९ | लातूर | | | | | | | | |
| २० | उस्मानाबाद | | | | | | | | |
| २१ | परभणी | | | | | | | | |
| २२ | हिंगोली | | | | | | | | |
| २३ | नांदेड | | | | | | | | |
| | लातूर संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **लातूर संभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| २४ | बुलढाणा | | | | | | | | |
| २५ | वाशिम | | | | | | | | |
| २६ | अकोला | | | | | | | | |
| २७ | अमरावती | | | | | | | | |
| २८ | यवतमाळ | | | | | | | | |
| | अमरावती संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **अमरावती संभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| २९ | वर्धा | | | | | | | | |
| ३० | नागपूर | | | | | | | | |
| ३१ | भंडारा | | | | | | | | |
| ३२ | गोंदिया | | | | | | | | |
| ३३ | चंद्रपूर | | | | | | | | |
| ३४ | गडचिरोली | | | | | | | | |
| | नागपूर संभागस्तरीय | | | | | | | | |
| | **नागपूर संभाग एकूण** | | | | | | ० | ० | ० |
| | **राज्य एकूण** | | | | | | ० | ० | ० |

प्रपत्र-१

भौगोलिक मानांकन प्राप्त पिकांचे अधिकृत वापरकर्ते वाढविणेबाबतचा मासिक अहवाल

माहे अखेर:

| अ. क्र. | जिल्हा/ संभाग | अहवाल महिनाअखेर संस्थेमार्फत नोंदणी कार्यालय,चेन्नई यांना सादर केलेले प्रस्ताव संख्या | मंजुरी प्राप्त झालेले वापरकर्ते संख्या | वापरकर्ते वाढविणेसाठी पुढील महिन्यातील नियोजीत प्रस्ताव संख्या | मानांकन प्राप्त वापरकर्ते वाढविण्याच्या दृष्टीने नोंदणी, प्रचार, प्रसिध्द व मुल्य साखळी विकसीत करण्यासाठी पणन विभागाकडे मागणी केलेला निधी (रु) | अहवाल अद्यावत केल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| १ | ठाणे | | | | | |
| २ | पालघर | | | | | |
| ३ | रायगड | | | | | |
| ४ | रत्नागीरी | | | | | |
| ५ | सिंधुदुर्ग | | | | | |
| | कोकण संभागस्तरीय | | | | | |
| | **कोकण सभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | नाशिक | | | | | |
| ७ | धुळे | | | | | |
| ८ | नंदुरबार | | | | | |
| ९ | जळगाव | | | | | |
| | नाशिक संभागस्तरीय | | | | | |
| | **नाशिक सभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| १० | अहमदनगर | | | | | |
| ११ | पुणे | | | | | |
| १२ | सोलापूर | | | | | |
| | पुणे संभागस्तरीय | | | | | |
| | **पुणे सभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| १३ | सातारा | | | | | |
| १४ | सांगली | | | | | |
| १५ | कोल्हापूर | | | | | |
| | कोल्हापूर संभागस्तरीय | | | | | |
| | **कोल्हापूर संभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| १६ | औरंगाबाद | | | | | |
| १७ | जालना | | | | | |
| १८ | बीड | | | | | |
| | औरंगाबाद संभागस्तरीय | | | | | |
| | **औरंगाबाद संभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| १९ | लातूर | | | | | |
| २० | उस्मानाबाद | | | | | |
| २१ | परभणी | | | | | |
| २२ | हिंगोली | | | | | |
| २३ | नांदेड | | | | | |
| | लातूर संभागस्तरीय | | | | | |
| | **लातूर संभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| २४ | बुलढाणा | | | | | |
| २५ | वाशिम | | | | | |
| २६ | अकोला | | | | | |
| २७ | अमरावती | | | | | |
| २८ | यवतमाळ | | | | | |
| | अमरावती संभागस्तरीय | | | | | |
| | **अमरावती संभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| २९ | वर्धा | | | | | |
| ३० | नागपूर | | | | | |
| ३१ | भंडारा | | | | | |
| ३२ | गोंदिया | | | | | |
| ३३ | चंद्रपूर | | | | | |
| ३४ | गडचिरोली | | | | | |
| | नागपूर संभागस्तरीय | | | | | |
| | **नागपूर संभाग एकूण** | ० | ० | ० | ० | ० |
| | **राज्य एकूण** | ० | ० | ० | ० | ० |